लातूर समाचार
LATUR SAMACHAR

# सुदर्शन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात
# सायबर सुरक्षा कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी** : राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने Cyber Shiksha for Cyber Suraksha या उपक्रमांतर्गत सुदर्शन माध्यमिक विद्यालय व सुदर्शन कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा घेण्यात आली.

'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग मेसेज ओळखणे, पासवर्ड सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक प्रतिबंध, तसेच सायबर गुन्हे नोंदणी व हेल्पलाईन १९३० याबाबत मार्गदर्शन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा ओवांडकर, प्राचार्य श्री. प्रविन माने, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची जाणीव वाढल्याचे शिक्षकांनी सांगितले.